REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थ०१।४।

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ३१ डिसेंबर १९४७ अंक ५१


दि

## बँक ऑफ इंडिया, लि.

**स्थापना १९०६**

खपलेलें भांडवल :- ३,००,००,०००.
वसूल झालेलें भांडवल :- १,५०,००,०००.
राखीव फंड :- २,००,०० ०००.
**मुख्य कचेरी :-ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.**

इतर शाखा :- मुंबईः- बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीकः-वांद्रें व अंधेरी. अहमदाबादः-भद्र (मुख्य शाखा), इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :-क्लाइव्ह स्ट्रीट ( मुख्य शाखा ), बडा बाजार व चौरंघी स्क्वेअर. नागपूरः-किंग्जवे व इतवारी बाजार. पुणेंः-लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), हैद्राबाद ( सिंध ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :- १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :-दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :-सर कावसजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता.

चालू ठेवींचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षां कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटीवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



## सामुदायीक शेती

( गटागटानें अगर एकत्र )-भांडवल गुंतवूं इच्छिणारे, प्रत्यक्ष काम करूं इच्छिणारे, शेतकी तज्ज्ञ, स्वतःची मोठ्या प्रमाणांत असलेली पडीक शेती आम्हांस सवलतीनें देऊं इच्छिणारे, यांनीं पत्रव्यवहार करावा.

आतांपर्यंत कांहीं ठिकाणचें सहकार्य आम्हीं मिळविलें आहे.

गायके अँड कंपनी, लिमिटेड
शंकरशेट रोड, पुणें २.

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८




—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमचीं वैशिष्ट्यें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स ताबडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

## विविध माहिती

**श्री. गुलाबचंद हिराचंद**—डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनच्या १९४८ सालच्या अध्यक्षस्थानीं श्री. गुलाबचंद हिराचंद ह्यांची निवडणूक झाली आहे.

**श्री. शंकरराव ओगले ह्यांची सूचना**—म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सची वार्षिक सभा श्री. शंकरराव ओगले ह्यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच भरली होती पोलाद, खाणी, वीज, वहातूक, इत्यादि मोठे धंदे सरकारी मालकीचे केले तरी खाजगी प्रयत्नांस नवे धंदे काढून ते वाढविण्यास पुरेसा वाव ठेवण्यांत यावा, अशी सरकारास सूचना त्यांनीं आपल्या भाषणांत केली.

**पाकिस्तानकडे जाणाऱ्या तागावर जकात**—पाकिस्तान सरकारनें तागाच्या निर्गतीवर जकात बसविली, त्यास प्रत्युत्तर म्हणून हिंदुस्थान सरकारनें पाकिस्तानाकडे जाणाऱ्या कच्च्या-पक्क्या तागावर जकात वसूल करण्याचें ठरविलें आहे.

**पौंडी शिलकांच्या परतफेडीच्या वाटाघाटी**—हिंदुस्थान, पाकिस्तान व ग्रेट ब्रिटन ह्यांचेमधील पौंडी शिलकांबाबत वाटाघाटी ९ जानेवारी,१९४८ रोजीं दिल्ली येथें सुरू होतील. १ जानेवारी ते ३० जून, १९४८ अखेर ब्रिटिश सरकारनें किती पौंडी शिल्लक हिंदुस्थानास व पाकिस्तानास उपलब्ध करून द्यावी, हें त्या वाटाघाटींत ठरविलें जाईल. जून, १९४८ अखेर, पौंडी शिलकेच्या पूर्ण परतफेडीसंबंधीं अखेरचीं बोलणीं केलीं जातील. वाटाघाटींसाठी येणारें ब्रिटिश शिष्टमंडळ प्रथम कराची येथें उतरून पाकिस्तानी सरकारशीं विचारविनिमय करील.

**आगपेट्यांवरील नियंत्रणें रद्द**—आगपेट्यांची वहातूक व किंमत ह्यांवरील सर्व नियंत्रणें मुंबई सरकारनें रद्द केलीं आहेत.

**गुळाच्या निर्गतीवर जकात**—कोल्हापूर सरकारनें कोल्हापूर बाजारपेठेंतून बाहेर जाणाऱ्या गुळावर दर रव्यास १ रु. प्रमाणें जकात बसविली आहे. ह्या जकातीचें वार्षिक उत्पन्न १० ते १२ लक्ष रुपये होईल असा अंदाज आहे.

**अमेरिका-इराण करार**—इराणच्या लष्कराची कार्यक्षमता वाढविण्यासाठी अमेरिका इराणला सहाय करणार आहे. इराणच्या लष्करी प्रश्नाशीं इतर राष्ट्रांनीं ढवळाढवळ करतां कामा नये, अशी प्रस्तुत करारांत एक अट आहे.

**हिंदुस्थान-लंडन विमान वहातूक**—हिंदी संघराज्य आणि इंग्लंड ह्यांच्या दरम्यान विमान-वहातूक करण्यासाठी एअर-इंडिआ-इंटर नॅशनल लि. ह्या नांवाची एक नवी कंपनी निघणार असल्याचें समजतें. कंपनीच्या भांडवलापैकी ४९ टक्के भांडवल सरकार घालणार असून २० ते २५ टक्के एअर-इंडिया ( टाटा ) विकत घेणार आहे. उरलेलें भांडवल सार्वजनिक विक्रीसाठी खुलें ठेवण्यांत येणार आहे. कंपनीच्या बोर्डाचे निम्मे सभासद आणि अध्यक्षही सरकारच नेमणार आहे.

**अमेरिकेंतील मोटारींचें उत्पादन**—अमेरिकेंत येत्या दोन वर्षांत तरी पोलादाच्या मागणीइतका त्याचा पुरवठा करणें कठीण जाईल. असें असलें तरी अमेरिकन मोटार कारखाने जगाची मोटारींची गरज भागविण्याचे आटोकाट प्रयत्न करीत आहेत. नोव्हेंबरच्या मध्याच्या सुमारास अमेरिकेंतील कारखान्यांत दररोज २०,००० मोटारी तयार होत होत्या. हा उत्पादनाचा वेग ताशीं ८३३ मोटारी व मिनिटागणिक १४ मोटारी असा पडतो. ह्याच वेगानें प्रगति होत राहिल्यास ५० लाख मोटारींच्या उत्पादनाचा १९३७ सालांतील उच्चांक मोडला जाईल.

**जगाची वाढती लोकसंख्या**—जगाची लोकसंख्या दरवर्षी १॥ ते २ कोटि ह्या प्रमाणांत वाढत असल्यानें अन्नाची व इतर आवश्यक वस्तूंची मागणी युद्धकालापूर्वीपेक्षा अधिक आहे. १९४६ पूर्वीच्या दहा वर्षांत जगाची लोकसंख्या ८ टक्क्यांनीं वाढली असा एक अंदाज आहे. ह्या वाढत्या लोकसंख्येच्या उदरभरणाची सोय करावयाची असेल तर येत्या पंचवीस वर्षांत जगांतील अन्नाचें उत्पादन ११० टक्क्यांनीं वाढविलें गेलें पाहिजे, असा सर जॉन बॉईड ऑर ह्या तज्ज्ञाचा अंदाज आहे.

**विमानतळांची सुधारणा**—दिल्ली, कलकत्ता, मुंबई, मद्रास, अलाहाबाद, गया, लखनौ, नागपूर, अहमदाबाद, भुवनेश्वर व विजगापट्टम येथील विमानतळ सुधारण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें दोन कोटी रुपये मंजूर केले आहेत.

**संगमेश्वरम् योजना**—कृष्णा व पेन्नार नद्यांवर धरणें बांधून मद्रास प्रांतांतील २५ पैकी ७ जिल्ह्यांतील २५ लक्ष एकर जमिनीस कालव्याचें पाणी उपलब्ध करून देण्याच्या मद्रास सरकारच्या प्रचंड योजनेस ७८ कोटी रुपये खर्च येणार आहे. ह्या योजनेची सध्या पूर्व तयारी चालू आहे.

**डॉलर्ससाठीं शिकस्तीची आवश्यकता**—"ग्रेट ब्रिटन जवळील सोन्याचा व डॉलर्सचा साठा ह्या वर्षअखेर २०० कोटी डॉलर्स किंमतीचा भरेल. दर आठवड्यास ग्रेट ब्रिटन ५½ कोटी डॉलर्सचा फडशा पाडीत आहे. ग्रेट ब्रिटनचें परराष्ट्रीय देणें २,१०० कोटी डॉलर्सपेक्षा अधिक भरेल. त्यामुळें, ग्रेट ब्रिटनला आपला सोन्याचा साठा व डॉलर्स मिळविण्यासाठी खर्च करीत रहावें लागेल. सरकारला आपला भांडवली खर्च २० कोटी पौंडांनीं कमी करणें भाग पडलें आहे. डॉलर्स मिळविण्याची धडपड लवकर संपण्याची शक्यता दिसत नाहीं." :—ब्रिटिश अर्थमंत्री, सर स्टॅफर्ड क्रिप्स.


### बँक ऑफ पूना लि.

—शेड्यूल्ड बँक—

४५५ रविवार, पुणें २.

**"कॉलेज विद्यार्थ्यांकरितां परीक्षेच्या फीची सोय"**

कॉलेज विद्यार्थ्यांना परीक्षेची फी द्यावयास अडचण भासूं नये याकरितां बँकेनें योजना अमलांत आणली आहे. त्याचा विद्यार्थ्यांनीं फायदा घ्यावा. संपूर्ण माहितीकरितां कॉलेजचे प्रिन्सिपॉलसाहेब यांचेकडे अगर बँकेच्या मुख्य ऑफिसमध्यें चौकशी करावी.

गो. गं. साठे,
मॅनेजर ( A. B. I. London )

एकमेव महत्त्वाचें मासिक

### आपली शेती

संपादकः— जी. अनन्तन्
वा. वर्गणी ३-८-०
नमुना अंक ०-७-०

प्रति महिन्याचे दहाव्या दिनांकास प्रसिद्ध होतें.

जानेवारी १९४८ चा मोठा अंक योजक कै. वासुकाका जोशी, यांचे स्मरणार्थ प्रसिद्ध होईल.

लिहाः—व्यवस्थापक, "आपली शेती," चित्रशाळा, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ३१ डिसेंबर १९४७




प्रो. वा. गो. काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## आग्नेय आशिआंतील राष्ट्रवादाची पार्श्वभूमि

### ब्रिटिश, फ्रेंच व डच सरकारांचें धोरण

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपासून आग्नेय आशियांतील राष्ट्रीय चळवळींना तीन वेगळ्या साम्राज्यशाही राष्ट्रांना तोंड द्यावें लागत आहे. ब्रह्मदेश, मलाया आणि उत्तर बोर्निओ ह्या देशांतून लष्करी पराभवामुळें ब्रिटनला पाय काढावा लागला. १९४२ मध्यें ब्रिटिश आणि डच साम्राज्यशाही अंमल जपानी आक्रमणामुळें कोसळून पडला. इंडोनेशिआंतील हॉलंडचें साम्राज्य आणि इंडो-चायनांतील फ्रेंच साम्राज्य ह्यांचीही स्थिति ब्रिटिश साम्राज्याप्रमाणेंच झाली. आशिआ खंड आशियांतील लोकांसाठींच आहे, ह्या जपानच्या प्रचाराचा परिणाम होऊन ठिकठिकाणीं साम्राज्यशाहीविरोधी पण सुरवातीला तरी जपानला अनुकूल अशा चळवळी झाल्या. जपानी प्रचाराचें खरें स्वरूप लक्षांत आल्यावर अर्थातच जपान विरोधीही चळवळी सुरू झाल्या; आणि संयुक्त राष्ट्रांचा विजय समीप येत चालला त्या प्रमाणांत ह्या चळवळींनीं पुन्हां संयुक्त-राष्ट्रसंघाची बाजू घेतली. जपानला पोषक अगर संयुक्त-राष्ट्रांना पोषक ह्या दोन्ही चळवळींतून, प्रामाणिक साम्राज्यविरोधी गटापासून तो तहत संधिसाधू धंदेवाईक राजकारणी गटापर्यंत अनेक तऱ्हेचे गट होते. तथापि ह्या सर्वसामान्य वैशिष्ट्याबरोबरच प्रत्येक साम्राज्य-विरोधी चळवळींची निराळीं अशींही कांहीं वैशिष्ट्यें होतीं. १९४५ सालीं संयुक्त-राष्ट्रांचा जय झाल्यावर वरील सर्व देशांतून तद्देशीय लोकांचीं सैन्यें होतीं. ह्या सैन्यांना शस्त्रास्त्रांचा पुरवठा दोन्हीं पक्षांकडून झालेला होता. युद्धाच्या अखेरच्या अवस्थेंत जपाननें आपल्या उपयोगासाठी वरील प्रदेशांतून सैन्यें उभारलीं, त्यांना शस्त्रें पुरविलीं आणि लष्करी शिक्षणही दिलें. त्याचबरोबर संयुक्त राष्ट्रांनींही तद्देशीय गनिमांच्या पथकांना शस्त्रें पुरविलीं आणि त्यांची संघटना उभारली. युद्धाची इतिश्री झाल्यानंतर ब्रिटन, हॉलंड आणि फ्रान्स ह्यांच्यापुढें एक नवीनच प्रश्न उत्पन्न झाला. जपान-विरोधी ज्या राजकीय अगर लष्करी संघटना त्यांनीं उभारल्या होत्या त्यांना जनतेचे प्रतिनिधी समजून त्यांच्याशीं वाटाघाटी करावयाच्या, कीं आपल्या परंपरागत हक्कांचा आधार घेऊन ह्या संघटनांना अधिकृत मान्यता नाकारावयाची, हा तो प्रश्न होता.

तथापि; ह्या बाबतींत हॉलंड व फ्रान्स ह्यांच्यापेक्षां ब्रिटनची परिस्थिति वेगळी आणि अधिक अनुकूल होती. ब्रह्मदेशांत तर ब्रिटिश सैन्यें लढत लढतच घुसलीं आणि त्यांनीं जपानी लष्करापासून त्या देशाची 'मुक्तता' केली. मलायामध्यें जपानची शरणागती झाल्या बरोबर ब्रिटननें आपलें लष्कर तेथें उतरविलें. त्यामुळें १९४५ अखेर ब्रह्मदेशांत आणि मलायांत ब्रिटनची लष्करी पकड बऱ्याच प्रमाणांत युद्धपूर्वकालाइतकीच बसली. फ्रान्सची आणि हॉलंडची परिस्थिति मात्र अगदी वेगळी होती. हे दोन्ही देश जर्मन सत्तेखालून नुकतेच मुक्त झालेले असल्यानें त्यांना स्वतःच्या बळावर अतिपूर्वेकडील आपले प्रदेश पुन्हां जिंकणें अशक्य होतें. आग्नेय आशिआंतून जपानी लष्कराला हकलण्याची आणि त्याची शरणागति पत्करण्याची कामगिरी मुख्यतः ब्रिटिश आणि अमेरिकन लष्करानें केली. ह्या लष्कराच्या मागोमाग केवळ स्वामित्वाची खूण म्हणून फ्रेंच अगर डच लष्कराच्या थोड्याशा तुकड्या पाठविण्यांत आल्या. अर्थातच मुक्त झालेल्या प्रदेशांतून खरी सत्ता ब्रिटिश आणि अमेरिकन लष्कराच्या प्रमुखांच्याच हातीं होती. युद्ध जिंकण्याच्या दृष्टीनें या लष्करी हालचाली जरी मुख्यतः करण्यांत आल्या तरी त्यांचा परिणाम पुढील राजकारणावर झाला. उत्तर इंडोचायनांत, व्हिएट नाम पक्षानें स्थापलेल्या लोकशाही राज्याला चीननें आपलें संरक्षण दिलें. दक्षिण इंडोचायनांत ब्रिटननें ह्या लोकशाही राज्याला मान्यता दिली नाहीं; उलट फ्रान्सशीं सहकार्य करून फ्रेंच सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्यास ब्रिटननें मदतच केली. इंडोनेशिआंतील जपानची शरणागति पत्करण्यासाठीं जें ब्रिटिश लष्कर पाठविण्यांत आले तें पुरेसें नव्हतें. त्यामुळें ब्रिटिश लष्कराला आपल्या सुरक्षिततेची खात्री नव्हती. त्याचा परिणाम असा झाला कीं हॉलंडचा विरोध असतांही इंडोनेशिअन रिपब्लिकला ब्रिटननें व्यवहारतः तरी मान्यता दिली. आग्नेय आशिआंतील डच आणि फ्रेंच साम्राज्या-बद्दल ब्रिटननें स्वीकारलेल्या धोरणांत एकसूत्रता नव्हती. केवळ राजनैतिक दृष्टीनें पाहिले तर फ्रेंचांची बाजू डचांच्या मानानें कमकुवत होती. कारण, इंडोचायनांतील फ्रेंच सरकार युद्धकाळीं जपानशीं सहकार्य करीत होतें. मार्च १९४५ पर्यंत हें सहकार्य चालू होतें. उलट, व्हिएट-नाम सरकारला चीनमधील अमेरिकन व चिनी सरकारांचा पाठिंबा होता. असें असतांही ब्रिटननें तात्पुरता फायदा लक्षांत घेऊन उत्तर इंडोचायनामधील फ्रेंचांना मदत केली. ह्या सर्वांचा शेवट असा झाला कीं, फ्रेंच आणि डच सैन्यांना तद्देशीय राजकीय संघटनांचा विरोध होऊं लागला.

आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणेंच विचार करावयाचा तर व्हिएट नाम अथवा इंडोनेशिअन रिपब्लिकला अस्तित्वच नाहीं असें म्हणतां येईल आणि मग अर्थातच ह्या सरकारांना बंडखोर म्हणून नेस्तनाबूद करण्याचा अधिकार फ्रेंच व डच सरकारांना पोंचेल. लष्करी दृष्ट्या हें शक्य आहे किंवा नाहीं हा प्रश्न निराळा. इंडोनेशिआंतील तद्देशीय सरकारांविरुद्ध डचांनीं शस्त्र उचलतांच तो प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षितता-समितीपुढें आला. ह्यापासून धडा घेऊन फ्रान्सनें नकाराच्या अधिकाराचा उपयोग करून, जाव्हामधील शस्त्रसंधीवर सुरक्षितता समितीनें नजर ठेवण्याच्या रशिअन सूचनेला धाब्यावर बसविलें. ब्रह्मदेशांत ब्रिटननें मात्र तद्देशीय राष्ट्रीय चळवळीशीं शस्त्रांचा लढा टाळण्यांत यश मिळविलें. तेथील घटनासमितीच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाआड ब्रिटन आलें नाहीं. जनरल ऑंग सान आणि त्यांचे सहकारी ह्यांचा खून झाल्यावर सुद्धां ब्रम्हदेशच्या गव्हर्नरानें ऑंग सानच्या पक्षांतूनच नवे मंत्री घेऊन पुन्हा मंत्रिमंडळ बनविलें. ब्रिटनच्या ह्या धोरणामुळें वसाहतीच्या जनतेविरुद्ध युद्ध करण्याचा प्रसंग ब्रिटनवर आला नाहीं. फ्रेंच व डच सरकारांवर मात्र हीं मोठ्या खर्चाचीं युद्धें त्यांच्या धोरणामुळें ओढवलीं. एकंदरींत ब्रिटनचें धोरण सत्तादानाचा देखावा करून वसाहतींना शक्यतोवर ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें राखण्याचें आहे. ह्याच्या उलट, फ्रेंच आणि डच साम्राज्य सरकारांचें धोरण आपआपल्या साम्राज्यांना फेडरल राज्याचें स्वरूप देण्याचें आहे. पण ह्या धोरणांत व्हिएट-नाम आणि इंडोनेशिअन रिपब्लिकन सरकारांना जुनें साम्राज्य नव्या स्वरूपांत चालू ठेवण्याच्या डावाचा वास येत आहे. त्यामुळें डच व फ्रेंच साम्राज्य सरकारांचे प्रयत्न व्हावे तितके यशस्वी होत नाहींत असें दिसून येतें.

## औद्योगिक परिषदेंत मंजूर झालेले ठराव

दिल्ली येथें नुकत्याच होऊन गेलेल्या औद्योगिक परिषदेंत मंजूर झालेल्या महत्त्वाच्या ठरावांचा गोषवारा पुढें दिला आहे.

### (१)

### तातडीचीं, अल्पकालीन व दीर्घकालीन उद्दिष्टें

गेल्या दोन वर्षांत औद्योगिक उत्पादनांत होत असलेल्या घटीमुळें ह्या परिषदेला चिंता वाटत आहे.

उद्योगधंद्यांच्या उत्पादन सामर्थ्याला अनुसरून उत्पादन न होण्याचीं व उद्योगधंदे न वाढण्याचीं कारणें पुढीलप्रमाणें आहेत:— (१) वहातुकीची अपुरी व्यवस्था, (२) चालक व मजूर ह्यांच्यामधील असमाधानकारक संबंध, (३) कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा आणि त्याची सदोष वाटणी, (४) भांडवली माल मिळण्यांतील आणि बांधकामाच्या उभारणींतील अडचणी, (५) उद्योगधंद्यांच्या गरजा भागविणाऱ्या मालाच्या आयातीवरील व त्यासाठी लागणाऱ्या हुंडणावळीवरील बंधनें, (६) यंत्र-विशारदांची टंचाई.

**वहातूकः**—ह्या अडचणीचा निरास करण्यासाठीं परिषद् पुढील तातडीचे उपाय सुचवित आहे. (१) सध्यां दरवर्षी सुमारें २॥ कोटी टन कोळसा हलविला जातो. त्याऐवजी तो ४ कोटी टन इतका हलविला जाण्याची व्यवस्था करणें. ह्यासाठीं रेल्वेच्या वाघिणींचा जास्तींत जास्त उपयोग करणें. (२) कारखान्यांच्या उत्पादन सामर्थ्याइतकें उत्पादन व्हावें म्हणून पक्क्या व कच्च्या आवश्यक मालाच्या वहातुकीचा अंदाज करणें. ही वहातूक व्हावी म्हणून कमी जरूरीचा माल अगर उतारू ह्यांची वहातूक कमी करणें. (३) मालाची वहातूक वाढविण्यासाठी रेल्वेच्या वहातुकींत, प्रेरणाशक्तींत आणि वाघिणींसंबंधीं एकवाक्यता आणण्याचा प्रश्न तपासून पहाणें. (४) रस्त्यांवरील, नद्यांवरील, समुद्रावरील वहातुकीचा आणि विमान वहातुकीचा पूर्ण उपयोग करणें.

**कच्चा मालः**—(१) पोलाद, सीमेंट, कॉस्टिक सोडा, इत्यादि महत्त्वाच्या औद्योगिक कच्च्या मालाच्या उत्पादनाला उत्तेजन देणें. (२) त्यांच्या आयातींत वाढ करणें. (३) ह्या बाबतींतील हुंडणावळीच्या अडचणी दूर करणें. (४) उत्पादन वाढण्यासाठी कमी पुरवठा असलेल्या महत्त्वाच्या औद्योगिक कच्च्या मालाचा नियोजित उपयोग करणें.

**तंत्र विशारदः**—(१) परदेशांतून तंत्र विशारद मिळविण्यासाठी प्रयत्न करावा. त्याचप्रमाणें, परदेशांतील तांत्रिक-शिक्षणाच्या संस्थांतून हिंदी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पाठविणें, (२) यंत्रविशारदांच्या शिक्षणाची हिंदुस्थानांत सोय करणें, (३) शास्त्रीय आणि तांत्रिक शिक्षण घेतलेल्यांची नोंद ठेवणें.

येत्या तीन ते पांच वर्षांत उत्पादन वाढविण्याचे जास्तींत जास्त जोरानें प्रयत्न करण्यांत यावेत ह्यासाठीं पुढील उपाययोजना करावी. (१) बांधकामाला लागणाऱ्या मालाची वाढती वहातूक लक्षांत घेऊन रेल्वेजची वहातुकीची शक्ति वाढविण्यांत यावी. इंजिनें व डबे ह्यांच्या आयातीला व बांधणीला प्राधान्य देण्यांत यावें. (२) पोलादाचे नवीन कारखाने काढावे व दरम्यान जरूरीचें लोखंड व पोलाद आयात करावें. (३) सीमेंटच्या उत्पादनाच्या वाढीच्या योजनेची त्वरा करावी. (४) विजेसाठी नवी धरणें बांधण्याबरोबरच सध्यांच्या धरणावर अधिक शक्ती निर्माण करण्याची त्वरा करावी. (५) कोळशाच्या धंद्याचा सत्वर विस्तार होण्यासाठीं इंडिअन कोल-फील्ड्स कमिटीच्या शिफारसी लवकर अंमलांत आणाव्या. (६) परदेशांतील तेलावर अवलंबून रहावें लागूं नये म्हणून देशांतच तेलाचा शोध करावा आणि कोळशापासून तेल काढण्याची शक्यता अजमावून पहावी.

देशांतील औद्योगिक उत्पादनाची वाढ करण्यासाठी काय करावे ह्याबद्दलच्या सूचना केल्यावर त्या अंमलांत आणण्यासाठी मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें आणि संस्थानें ह्यांच्या सहकार्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यांत आली आहे.

### (२)

### राष्ट्रीय औद्योगिक धोरण

देशाचा औद्योगिक विकास करण्याचे प्रयत्न करतांना पुढील सूत्रें लक्षांत ठेवण्याची सूचना करण्यांत आली आहे. (१) सामाजिक न्यायाला अनुसरून संपत्तीची वाटणी न्याय्य रीतीनें करून बहुजन समाजाचें रहाणीचें मान वाढविण्याची जरूरी. (२) जनतेंतील एकाच गटाच्या हातीं संपत्ति केंद्रित होऊं न देतां, देशाच्या उत्पादन सामर्थ्याचा पूर्ण उपयोग करावा. (३) कार्यक्षमता आणि उत्पादन ह्यांना बाध न आणतां देशाच्या सर्व भागांत उद्योगधंद्यांची वाटणी करणें आणि वेतन आणि नफा ह्यांच्यांत योग्य प्रमाण ठरविणें. (४) उद्योगधंद्यांचे तीन प्रकार करण्यांत यावे: (अ) सरकारच्या मालकीच्या व नियंत्रणाच्या लायकीचे उद्योगधंदे, (ब) ज्या उद्योगधंद्यावर सरकारची व खाजगी अशी दोन्ही प्रकारची संयुक्त मालकी व नियंत्रण असावें असे उद्योगधंदे, (क) खाजगी मालकीचे व नियंत्रणाचे उद्योगधंदे. वरीलप्रमाणें वर्गवारी करतांना देशाच्या मूलभूत आर्थिक विकासाचा व संरक्षणाचा प्रामुख्यानें विचार करण्यांत यावा.

### (३)

### परदेशी भांडवल

परकीय भांडवल, परकीय तज्ज्ञ आणि त्यांचें ज्ञान ह्यांचा देशाच्या औद्योगीकरणाला उपयोग होण्यासारखा असला तरी त्यासंबंधींच्या अटी राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें नियंत्रित करण्यांत याव्या. हिंदुस्थानांतील खाजगी उद्योगधंदे आणि परदेशांतील खाजगी उद्योगधंदे ह्यांच्यांतील करार-मदारांना मध्यवर्ती सरकारची आगाऊ संमति घेण्यांत यावी.

### (४)

### ग्रामोद्योग

देशांतील ग्रामोद्योगांचें राष्ट्रीय-अर्थव्यवस्थेंत असलेलें महत्व मान्य करून त्यांची स्थापना व विकास करण्याचें कार्य प्रांतिक सरकारें आणि संस्थानें ह्यांच्याकडे सोपविण्यांत यावें. मात्र मोठ्या उद्योगधंद्यांशी ग्रामोद्योगांची सांगड घालण्यांत यावी.

### (५)

### विक्रीवरील कर

विक्रीवरील करासंबंधीं पुढीलप्रमाणें शिफारस करण्यांत आली आहे. ह्या करासंबंधीं मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक सरकारशीं पुढील मुद्याबाबत विचारविनिमय करावा (१) उद्योगधंद्यांना आवश्यक असलेल्या कोळसा, पोलाद, सीमेंट आणि कापूस ह्यासारख्या वस्तूंवर कर घेण्यांत येऊं नये. (२) इतर औद्योगिक कच्च्या मालावरील कराचा दर बेताचा आणि एकसारखा असावा. (३) एकाच मालावर दोनदां कर घेण्यांत येऊं नये. (४) ह्या बाबतींत प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या धोरणांत एकसूत्रता आणावी.

(६)

### अल्कोहोलचें उत्पादन

जळण म्हणून अगर इतर औद्योगिक उपयोगासाठीं अल्कोहोल तयार करणाऱ्या कारखान्यांचा विस्तार होणें राष्ट्राच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. त्यासाठी पुढील शिफारसी करण्यांत आल्या आहेत. (१) मध्यवर्ती सरकारनें अल्कोहोल व पेट्रोल ह्यांचें मिश्रण करण्यासंबंधीं कायदा करावा. (२) असें मिश्रण योग्य भावांत देण्यास परवडावें म्हणून अबकारी कर कमी करण्याच्या प्रश्नाचा विचार व्हावा. (३) अल्कोहोलपासून इतर साधित पदार्थ तयार करण्यांवरील बंधनें रद्द करावीं.

(७)

### औद्योगिक बाबींची आकडेवार माहिती

१९४२ च्या 'इंडस्ट्रिअल स्टॅटिस्टिक्स' ॲक्ट प्रमाणें मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें आणि संस्थानें ह्या सर्व घटकांतून उद्योगधंद्यांसंबंधींचे बिनचूक आंकडे जमविण्याची सोय करण्यांत यावी.

### बॉंबे सिल्क फिलेचर्स, लि., बेळगांव

मोठगी येथील कारखान्याच्या इमारतींचें व नोकरांच्या चाळींचें काम पुरें झालें आहे. फिलेचर युनिटचें काम सुरू असून तें लवकरच पुरें होतांच कच्च्या सुताच्या विक्रीस प्रारंभ होईल. निदान एका फिलेचर युनिटपुरत्या कोशिट्या पुरविण्यापुरती तुतीची लागवड वाढविण्याचें मुंबई सरकारनें कबूल केलें होतें आणि शेतकऱ्यांस रेशमाचे किडे पाळण्याचा धंदा करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी कांहीं सवलतीहि देऊं केल्या होत्या. कंपनी ह्या बाबतींत सर्व प्रकारचें सहकार्य देण्यास तत्पर असतांहि, ही योजना सरकारनें उत्साहानें व वेळेवर हातीं घेतली नाहीं. त्यामुळें, ग्रामोद्योगाचा हा विभाग वाढविण्यासाठीं कंपनीस पूर्व आखणींत नसलेला खर्च सहन करावा लागला. वेगवेगळ्या ठिकाणीं दीर्घ मुदतीचे खंडाचे करार करून आणि मोठी रकम गुंतवून कंपनीला स्वतःची तुतीची लागवड करणें भाग पडलें. ५०० एकरांत लागवड पुरी झाली असून आणखी ५०० एकरांची लागवड हातीं घेण्याचा कंपनीचा विचार आहे. म्हणजे, फिलेचर युनिटला कोशिट्यांचा पुरेसा पुरवठा होऊं शकेल. तुतीचें पीक चांगलें आलें आहे व किडे पाळून कोशिट्या करण्याचे कामास प्रारंभहि झाला आहे. बेळगांव, धारवाड, कुरुंदवाड (सी.) आणि जमखिंडी ह्या विभागांतूनहि आतां लवकरच कोशिट्यांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होऊं लागेल. गेल्या वर्षांप्रमाणें १९४६–४७ मध्येंहि, मॅनेजिंग एजंटांनीं कंपनीकडून त्यांस मिळावयाचा मेहनताना घेतलेला नाहीं, ह्याबद्दल त्यांचे डायरेक्टरांनीं आभार मानले आहेत. कंपनीचें १० लक्ष रुपयांचे भांडवल विक्री झालेलें असून त्यापैकीं ४ लक्ष रुपये मागविलेले आहेत. कंपनीनें ठेवी घेतलेल्या नाहींत. जिंदगींचे बाजूस, सुमारें १½ लक्ष रुपये तुतीच्या लागवडींत गुंतलेले आहेत. मेसर्स एन. जी. नाईक आणि कं. लि. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

### अर्थशास्त्रज्ञांचें कर्तव्य

"इतर शास्त्रज्ञांप्रमाणें अर्थशास्त्रज्ञांनींहि आपल्या कार्यांत स्वतंत्र बुद्धि दाखविली पाहिजे; ह्या अगर त्या राजकीय पक्षास खुष करण्याचें त्यांचें काम नाहीं. अर्थशास्त्रज्ञांनीं सत्याचाच अवलंब करून, देशाचें बरें, वाईट करण्याची सत्ता असणाऱ्या सरकारचें योग्य तेंच मार्गदर्शन करावें. ":—पश्चिम बंगालचे गव्हर्नर, श्री. सी. राजगोपालाचारी ह्यांचें हिंदी आर्थिक परिषदेचें उद्घाटन करतेवेळचें भाषण.

### मागसलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांस खेडेगांवीं धंद्यांच्या कारागिरीचें शिक्षण

मुंबई सरकारनें पूर्वी नेमलेल्या एका कमिटीच्या शिफारसीप्रमाणें मागसलेल्या वर्गास खेडेगांवीं उद्योगधंद्यांचें शिक्षण देण्याचें कार्य सहकारी खातें करीत आहे. त्याचा "इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज व व्हिलेज इंडस्ट्रीजच्या" जॉइंट रजिस्ट्रारचा ३१ ऑगस्ट १९४७ अखेरचा सहा महिन्यांचा अहवाल पहातां, बरेंच उपयुक्त कार्य चालू असल्याचें दिसून येतें. सुरत, ठाणें, नाशिक व पश्चिम खानदेश जिल्ह्यांत १४ फिरत्या प्रात्यक्षिकें दाखविणाऱ्या टोळ्या काम करीत होत्या. लाख काम, वेत काम, बांबूकाम, कातडी कमावणें, कापड विणणें, इत्यादि कामांचें शिक्षण मागसलेल्या विद्यार्थ्यांस गटागटानें देण्यांत आलें.

वरील ६ महिन्यांचे अवधींत, मागसलेल्या वर्गाच्या ३७ विद्यार्थ्यांनीं वेगवेगळ्या खेडेगांवीं धंद्यांचें शिक्षण घेतलें. ३१–८–४७ अखेर एकूण १३५ लोकांचें शिक्षण पुरें झालें. ८१ कारागिरांनीं खात्याकडे आर्थिक मदतीसाठीं अर्ज केले त्यांपैकी २४ अर्ज वरील ६ महिन्यांतील आहेत. ऑगस्ट १९४७ अखेर ३०,००० रुपयांची मदत मंजूर करण्यांत आली; त्यांपैकी १५,००० रु. देणगीदाखल होते व १५,००० रुपयांचीं कर्जें होतीं. ह्या संबंधांतील नियम दुरुस्त करण्याचें काम चालू आहे. कारागिरांची सहकारी धर्तीनें संघटना व्हावी, ह्या दृष्टीनें सहकारी संस्थांसच प्राधान्यानें देणग्या व कर्जें यावीं व जेथें अशी संघटना अशक्य असेल अशा ठिकाणींच व्यक्तिगत कारागिरांना तीं यावीं, असें खात्याचें ह्यापुढें धोरण राहील.

मागसलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांस निवडक औद्योगिक व यांत्रिक शिक्षण संस्थांतून शिष्यवृत्त्या देण्याचें सरकारनें ठरविलें, त्यास मुबलक प्रसिद्धि देण्यांत आली. अशा संस्थांच्या चालकांमार्फत आलेल्या सर्व २३ अर्जांस शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या. ३१ ऑगस्ट नंतर आणखी १८ अर्ज दाखल झाले आहेत.

### महागाई कशी वाढत आहे?

| | ऑगस्ट १९३९ चा शेवटचा आठवडा | ऑक्टोबर, १९४६ | सप्टेंबर, १९४७ | ऑक्टोबर, १९४८ | ऑक्टोबर, १९४६ चे मानानें वाढ (+) अथवा घट (–) |
|---|---|---|---|---|---|
| खाद्य पदार्थ | १०० | २५५·१ | २८१·२ | २८०·४ | +२५·३ |
| औद्योगिक कच्चा माल | १०० | ३०३·५ | ३७१·६ | ३७६·६ | +७३·१ |
| अर्ध–पक्का तयार माल | १०० | २३९·७ | २५८·१ | २५६·८ | +१७·१ |
| पक्का माल | १०० | — | २७९·८ | २८०·६ | — |

**अमेरिकन बोटींची विक्री**—अमेरिकेच्या मॅरिटाइम कमिशननें ९० सप्टेंबर, १९४७ पर्यंत एकूण १०७४ व्यापारी वहातुकीचीं जहाजें परदेशांना विकण्यास परवानगी दिली. ह्या जहाजांपैकी कोरडा माल नेणारीं ५२८ असून २१६ टँकर्स आहेत. हिंदुस्थानला विकण्यासाठी १४ बोटींची परवानगी देण्यांत आली. वरील सर्व बोटी अमेरिकेनें युद्धकालांत बांधलेल्या बोटींपैकी आहेत.

## साखर कारखाने व मुंबई सरकारचें धोरण

### श्री. डहाणूकर ह्यांची टीका

सक्तीनें धान्य पिकें काढण्यास लावणारा "बॉबे ग्रोथ ऑफ फूड क्रॉप्स" कायदा मुंबई प्रांतांतील साखर कारखान्यांस लागू राहूं नये, अशी मागणी डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनच्या वार्षिक सभेंत श्री. एम. एल. डहाणूकर ह्यांनीं अध्यक्षपदावरून केली. ह्या कायद्यामुळें कारखान्यांस येणाऱ्या अडचणींचा त्यांनीं उल्लेख केला आणि अनुभवाचे अभावीं धान्याचीं पिकें काढण्यांत त्यांना पुरेसें यश कसें येऊं शकत नाहीं हेंहि त्यांनीं सांगितलें. साखर कारखान्यांस आवश्यक तेवढें पाणी मिळत नाहीं आणि पेंडीच्या वाटणी संबंधांतहि परिस्थिति समाधानकारक नाहीं अशी त्यांनीं तक्रार केली. कारखाने जमिनीच्या मालकांना खंड देतात, त्याच्या विषयीं चौकशी करण्यासाठीं मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. कायदेशीर करारांचे बंधनावर व पावित्र्यावरच त्यामुळें घाला येत आहे, अशी श्री. डहाणूकर यांनीं टीका केली. साखरेचे उपपदार्थ करण्याच्या धंद्यास हिंदुस्थान सरकारचें धोरण पोषक असलें, तरी मुंबई सरकारचें धोरण उपकारक नाहीं; अल्कोहोलच्या धंद्यास मारक होणार नाहीं अशा रीतीनें दारूबंदीची योजना कशी आखतां येईल ह्याचा विचार करण्याकरितां सरकारनें एक प्रातिनिधिक परिषद बोलवावी, असें त्यांनीं सुचविलें. ह्या प्रश्नाचा अखिल भारतीय दृष्टिकोनांतूनच विचार होणें आवश्यक आहे.

## रशियानें रेशनिंग कसें बंद केलें ?

### पुरवठा वाढवला; चलन आखडलें.

रशियानें रेशनिंगची पद्धत अनपेक्षितपणें बंद करून आपल्या नागरिकांस आश्चर्याचा एक धक्का दिला; कारण तेथील वाटप पद्धति इतक्या लवकर नष्ट करतां येईल अशी कोणाचीच कल्पना नव्हती. वाटप पद्धति बंद करणें व रशियन चलनाची—रूबलची—किंमत उतरविणें ह्या दोन्ही गोष्टी एकदमच घडवून आणण्यांत आल्या. युद्धकाळांत व युद्धोत्तर काळांत रशियन शेतकऱ्यांस भरपूर पैसा मिळाला व कित्येक लक्षाधीशहि झाले. ही सांठलेली संपत्ती व युक्राइनमध्यें जर्मनांनीं प्रसृत केलेल्या नोटा ह्यांचेमुळें भरमसाट चलनविस्तार झाला. परंतु, कडक रेशनिंग चालू असेपर्यंत ही संपत्ती हानिकारक होऊं शकत नव्हती. कारण, पैसा देऊं केला तरी माल मिळूं शकत नव्हता. रेशनिंग बंद केल्यावर ह्या संपत्तीस मोकळें रान मिळालें असतें; आतां सांठवलेल्या २,००० रूबलसची किंमत २०० रूबल्सवर आणून ठेवल्या कारणानें, पैसेवाल्यांची क्रयशक्ति नियंत्रित झाली आहे आणि त्यामुळें बाजार काबीज करण्याचें त्यांचें साधनच नष्ट झालें आहे. रशियांत फक्त शहरांतच रेशनिंग होतें. शहरांतील दुकानांचे दोन प्रकार होतेः—(१) "रेशनचीं" दुकानें व (२) "व्यापारी" दुकानें. रेशनच्या दुकानांत नागरिकांना ठराविक दरांत त्यांच्या वाट्याचा रेशनचा माल मिळत असे. ज्यांना आणखी माल हवा असेल, ते व्यापारी दुकानांत जाऊं शकत. तेथें महाग दरानें माल मिळूं शके. अर्थात, व्यक्तिगत व्यापाऱ्यास त्यामुळें हिंदुस्थानांतील काळ्या बाजारवाल्याप्रमाणें जादा नफा मिळत नसे, हें उघड आहे.

### सिंधू री-सेटलमेंट कॉर्पोरेशन लि.

१ कोटी रु. भांडवलाची ही कंपनी मुंबई येथें स्थापन झाली आहे. घरें बांधणें, निर्वासितांची पुनः योग्य पायावर उभारणी करणें, इत्यादि तिचे उद्देश आहेत.

## कर देण्यांत सचोटी दाखवा

### हिंदी अर्थमंत्री, श्री. षण्मुखम् चेट्टी, ह्यांचें भाषण

"१५ ऑगस्टच्या पूर्वीचे काळांत, प्रांतांतून प्रातिनिधिक मंत्रिमंडळें कारभार पहात होतीं, परंतु मध्यवर्ती सरकार मात्र लोकमतास जबाबदार नव्हतें. त्यामुळें, मध्यवर्ती सरकारास परकें मानून, त्याचें नियंत्रण टाळण्याची प्रवृत्ति स्वाभाविकच निर्माण झाली. प्रांतिक सरकारांची आर्थिक भरभराट मध्यवर्ती सरकारच्या आर्थिक स्थैर्यावर अवलंबून आहे, हें आतां विसरून भागणार नाहीं. मध्यवर्ती सरकारच्या कर्जविषयक धोरणास बाधक होईल अशा रीतीनें कोणत्याहि प्रांतिक सरकारनें योजना आखणें कामा नयेत. देशाची फाळणी किती जरी अनुचित असली, तरी फाळणीमुळेंच मध्यवर्ती सरकार भक्कम होऊं शकलें आहे, हें निर्विवाद आहे. हा भक्कमपणा वाढविण्याचे दृष्टीनेंच व्यापारी वर्गानें वागलें पाहिजे.

"कराच्या वसुलीबाबत मध्यवर्ती सरकारची परिस्थिति असमाधानकारक आहे. इनकमटॅक्ससारख्या कराची ५०% सुद्धा रक्कम प्रत्यक्ष हातीं येत नाहीं. कर भरण्याचे संबंधीं व्यापारी वर्गानें अधिक सचोटी दाखविली पाहिजे, अशी राष्ट्रीय सरकारनें अपेक्षा कां करूं नये ? व्यापारी वर्गाच्या गेल्या कांहीं वर्षांतील दुष्कृत्यांमुळें ह्या वर्गाबद्दल तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे, ही गोष्ट त्यांनीं विसरतां कामा नये.

"कित्येक प्रांत वहातुकीसारख्या धंद्यांची मालकी स्वतःकडे घेत आहेत. ह्या धंद्यांतील होणाऱ्या नफ्यावर त्यांनीं मध्यवर्ती सरकारास इन्कमटॅक्स वास्तविकपणें दिला पाहिजे. ह्याविषयीं नव्या घटनेंत तरतूद करणें आवश्यक आहे."

### हिंदुस्थान-पाकिस्तान धान्य विनिमय

हिंदुस्थानाची फाळणी होण्यापूर्वीच ठरल्याप्रमाणें पाकिस्तानानें हिंदुस्थानास बरेंच धान्य अद्याप द्यावयाचें आहे; तेव्हां पाकिस्तानास हिंदुस्थानाकडून बाकी धान्य हवें असल्यास पाकिस्तानानें आपला पहिला शब्द पुरा केला पाहिजे, असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे. पाकिस्तानानें आपल्या तांदळाच्या पिकाचा अंदाज वास्तवतेपेक्षां फारच कमी केला असून, त्या अंदाजाप्रमाणेंहि तो देश आपणांस १,५०,००० टन तांदूळ कर्जाऊ अगर बाजारभावानें विकत देऊं शकेल. ही किंमत ५० कोटी रुपये भरेल. पाकिस्तानला हवा असलेला ६५,००० टन गहूं हिंदुस्थान त्यास देण्यास तयार आहे; परंतु पाकिस्ताननें दक्षिण हिंदुस्थानच्या तुटवड्याच्या भागांस आपला शिलकी तांदूळ तांतडीनें पोचविला पाहिजे. ह्या सर्व प्रश्नांचा विचार करण्यासाठीं दोन्ही देशांच्या प्रतिनिधींची वाटाघाट दिल्ली येथें ता. २ जानेवारी रोजीं सुरू होईल, असें समजतें.

### भांडवल वाढीस मान्यता

| कंपनी | मान्य केलेली वाढ (रु.) |
|---|---|
| खटाव मकनजी मिल्स लि. | २९, ९२, ५०० |
| स्वस्तिक ऑईल मिल्स लि. | २०, २५, ००० |
| किशनचंद चेलाराम (इंडिया) लि. (नवी कंपनी) | १५, ००, ००० |
| कालको इंजिनिअरिंग वर्क्स लि. इचलकरंजी (नवी कंपनी) | २५, ००, ००० |
| शिंधिया स्टीम नॅ. कं. लि. | २, २५, ००, ००० |
| फाजलभॉय लि. | ५, ००, ००० |

## दंगलीच्या विभागांतील आसामींवर काढलेल्या हुंड्या

### बँकांची अडचण दूर करण्यासाठी नवा ऑर्डिनन्स

अशांततेच्या प्रदेशांतील फर्म्स व कंपन्या ह्यांवर काढलेल्या हुंड्या सत्कारून घेणें बँकांस अशक्यप्राय झालें आहे. ज्यांचेवर हुंड्या काढलेल्या असतील, अशांना शोधून काढणेंच अवघड झालें आहे. अशा हुंड्या नाकारल्या जाऊन परत आल्या असें मानण्यास बँकांना परवानगी देणारा एक ऑर्डिनन्स काढण्यांत आला आहे. त्यामुळें निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टांत तात्कालिक दुरुस्ती होत आहे. आजच्या कायद्याप्रमाणें, हुंडी नाकारली असें मानण्यापूर्वी ती सत्कारण्यासाठीं किंवा पैसे वसुलीसाठी प्रत्यक्ष दाखल करावी लागते. दंग्याच्या परिस्थितींतहि ह्या नियमास अपवाद सांगितलेला नाहीं; त्यामुळें बँकांनीं हुंडी सत्कारून घेतली नाहीं आणि माल उतरवून घेऊन सांठवून ठेवला तर त्यांना गोडाऊन व विमा ह्यांसाठी चार्जेस भरत रहावें लागतें. माल विकण्याचा त्यांस अधिकार नसल्यामुळें, ह्या खर्चाचे पायीं त्यांचें तारण दररोज कमी होत जातें! हें टाळण्यासाठी मुख्यतः बँकांच्या संरक्षणाप्रीत्यर्थ वरील ऑर्डिनन्सनें कायद्यांत दुरुस्ती केली असली, तरी एकंदर सामान्य परिस्थितीच्या दृष्टीनेंहि माल अडकून न पडतां तो वाटला जाणें इष्टच आहे. बँकेच्या प्रत्यक्ष गिऱ्हाइकाचे दृष्टीनें विचार करतां, गोडाऊन चार्जेस हल्लीं फार वाढले आहेत ते नफ्याचा गाळा खाऊन टाकून अखेर माल विक्रीनंतर उलट नुकसानभरपाई करण्याचीच त्यावर पाळी यावयाची. ती तरी प्रस्तुत ऑर्डिनन्समुळें टळेल! योग्य मुदतीनंतर माल विकून टाकून आलेल्या रकमेंतून स्वतःचे येणें वसूल करून बाकी रक्कम गिऱ्हाइकाचे खातीं जमा करण्याचा अधिकार ऑर्डिनन्सनें बँकांस दिला आहे. ह्या अधिकाराचा बँकांनीं दुरुपयोग करूं नये, ह्यांसाठी रिझर्व्ह बँकेकडे माहितीचे तक्ते पाठविण्याचें बंधन बँकांवर घालण्यांत आलें आहे.

मुदतीबाबत कायद्याची अंमलबजावणीहि ऑर्डिनन्सनें कांहीं काळापुरती स्थगित केली आहे. ऑर्डिनन्स चालू आहे तोपर्यंत, १ ऑगस्ट १९४७ रोजीं अथवा त्यानंतर जे दावे मुदतीबाहेर गेले असे दावे दाखल करून घेण्याचा अधिकार ह्या ऑर्डिनन्समुळें कोर्टांस मिळाला आहे. अर्थात्, दंग्याच्या परिस्थितीमुळें मुदतीमध्यें दावा लावण्यास धनको असमर्थ होता, अशी कोर्टाची खात्री झाली पाहिजे. इंडियन लिमिटेशन ॲक्टांत ही दुरुस्ती करण्याचें कारण, दंगलीमुळें बँका योग्य मुदतींत आपल्या येण्याच्या वसुलीची व्यवस्था करूं शकल्या नाहींत. अशाच परिस्थितींतल्या इतर धनकोंसहि ह्या ऑर्डिनन्सचा फायदा मिळेल.

पाकिस्तान सरकारशीं विचारविनिमय करूनच ही योजना केलेली आहे आणि तें सरकार वरीलप्रमाणेंच व्यवस्था करील अशी अपेक्षा आहे.

---

**बँकांचीं खातीं वर्ग करण्यावर बंधन नाहीं**—हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांतील बँकांमधील ठेवीदारांचे पैसे एका देशांतून दुसऱ्या देशांत पाठविण्यावर बंधनें नाहींत; बँकांतील अपुरा नोकरवर्ग व दळणवळणाच्या आणि टपालाच्या अडचणी, ह्यांमुळेंच काय तो खोळंबा होत आहे, असें पाकिस्तान सरकारनें जाहीर केलें आहे.

**बक्षिसांचे बाँड**—हिंदुस्थान सरकारच्या १९४९ च्या बिनव्याजी बाँडपैकीं बक्षिसास पात्र असलेले बाँड निवडण्यासाठी षण्मासिक चिठ्या टाकण्यांत येतात. त्यांप्रमाणें १५ जानेवारी रोजीं मुंबई येथें सर कॉवसजी जहांगिर हॉलमध्यें सर कावसजी जहांगिर ह्यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीच्या देखरेखीखाली चिठ्या टाकण्यांत येतील.

### कॉलेज विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या फीची सोय

कॉलेजमधील कांहीं विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेची फी देतांना अडचण भासते, ती दूर व्हावी, याबद्दल "बँक ऑफ पूना" कांहीं करूं शकेल कां? अशी कांहीं कॉलेजच्या चालकांकडून व विद्यार्थ्यांच्या पालकांकडून, बँकेकडे विचारणा करण्यांत आली. सदरची मागणी विचार करण्यास योग्य अशी वाटल्यानें "सर परशुरामभाऊ कॉलेज" चे प्रिन्सिपाल श्री. सोनोपंत दांडेकर, यांच्यांशीं विचारविनिमय करून, बँकेनें खालील योजना अमलांत आणण्याचें ठरविलें आहे.

विद्यार्थ्याला स्वतः व त्याचा पालक, अशा दोघांच्या सहीवर दरसाल दरशेंकडा तीन टक्के दरानें कटमितीनें बँक कर्ज देईल. कर्जफेडीची मुदत जास्तींत जास्त सहा महिन्यांची आहे. कर्ज मागणीचे अर्जावर कॉलेजचे प्रिन्सिपॉल यांची शिफारस पाहिजे. कर्ज मागणीचे अर्ज कॉलेजच्या प्रिन्सिपॉलकडून विद्यार्थ्यांना मिळतील.

---

### अमेरिकन चित्रपटांवर जकात बसविली, परंतु इंग्लंडचा डॉलर्सचा खर्च कायमच!

ग्रेट ब्रिटननें चार महिन्यांपूर्वीं विदेशी फिल्म्सच्या आयातीवर ७५% जकात बसविली, तिचा रोख मुख्यतः अमेरिकन फिल्म्सवरच होता. कारण, ग्रेट ब्रिटन ही अमेरिकन फिल्म्सची फारच मोठी बाजारपेठ आहे आणि त्या फिल्म्सच्या खरेदीसाठीं दुर्मिळ डॉलर्स ओतावे लागतात. ग्रेट ब्रिटनमध्यें प्रवेश करणाऱ्या फक्त नवीन फिल्म्सवरच जकात बसविलेली आहे; अगोदरच ग्रेट ब्रिटनमध्यें असलेल्या विदेशी फिल्म्सवर जकात नाहीं. होलिवुडनें ग्रेट ब्रिटनकडे अजीबातच फिल्म्स धाडणें बंद करून आजतागायत मुळीच जकात भरलेली नाहीं! ग्रेट ब्रिटनमध्यें शिल्लक असलेल्या नव्या अमेरिकन फिल्म्स संपत आल्या असून जुन्या फिल्म्स पुनः पुनः दाखविल्या जात आहेत. अर्थात्, त्यांवर कर नाहीं. ब्रिटिश सरकारच्या कर योजनेंतील सवडीचा अमेरिकन चित्रपटवाले पूर्णपणें फायदा घेत आहेत. इकडे, अमेरिकन फिल्म्ससाठी ब्रिटिश जनता अमेरिकेस पैसे देत रहात आहे आणि कर वसुली मात्र नाहीं! ब्रिटिश फडणिशी खात्याचे सर विल्फ्रेड एडी ह्या संबंधांत अमेरिकन धंदेवाल्यांशीं पुनः बोलणीं सुरू करणार आहेत. हिंदुस्थानच्या पौंडी शिलकांबाबत १४ ऑगस्ट रोजीं लंडन येथें ब्रिटिश व हिंदी सरकारांमध्यें तात्पुरता करार झाला, त्यांवर ब्रिटिश सरकारतर्फे सही करणारे सर विल्फ्रेड एडी ते हेच होत.

---

**अ. वि. गृहाची महाराष्ट्र रोजनिशी व दिनदर्शिका**—दरवर्षीप्रमाणें पुणें अनाथ विद्यार्थी गृहानें महाराष्ट्र रोजनिशी व दिनदर्शिका प्रसिद्ध केली आहे. हुशार व गरीब विद्यार्थ्यांचें पालन पोषण व शिक्षण करणाऱ्या ह्या संस्थेस, वरील उपयुक्त जिनसा विकत घेऊन, महाराष्ट्रीयांनीं अवश्य मदत करावी, त्यामुळें संस्थेच्या कार्यास प्रोत्साहन मिळेल.

**मुंबई प्रांतांतील व्याजाचे कमाल दर**—नुकत्याच पास झालेल्या सावकार कायद्यानें तारणावरील कर्जास ६% व बिगर तारणावरील कर्जास ९% असा कमाल व्याजाचा दर सांगितला आहे. परंतु प्रत्यक्ष दर सरकारनें ठरवून द्यावयाचा आहे, तो अर्थातच वरील दरापेक्षा कमी असूं शकेल; जास्त मात्र नाहीं. मुंबई सरकारनें आतां एक हुकूम काढून व्याजाचे कमाल दर कायद्यास संमत असलेल्या कमाल दराइतकेच म्हणजे ६% व ९% असे जाहीर केले आहेत.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

**शेतकऱ्यांची प्रांतिक बँक**

म्हणजेच

**बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली ) ● स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग

९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५१

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | १०,१४,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १५,६५,००० रु. |

**खेळतें भांडवल ७ कोटी रुपयांवर**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे

ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

**सारस्वत**

**को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५ ३०-११-१९४७

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,२१,००० |
| ठेवी ... | रु. ७५,५९,१०० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८१,३८,५०० |

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा

सब-ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

**आरको**

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तु

आरको निलगिरी तेल

लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४










हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि वर्वे यांनीं छापिलें व

रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.